ठाणे, शनिवार दि. ७ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १३१ , पाने : ६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच! ®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

गणपती बाप्पा मोरया

गणेश उत्सव २०२४











# गणेशागमन लाभदायक होवो

श्री गणेशाचे आगमन आज होत आहे. त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

विशेष अग्रलेख पान ४ वर...



गणेश उत्सव
दैनिक महाराष्ट्र सम्राट — सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
ठाणे, शनिवार दि. ७ सप्टेंबर २०२४



# गणपती बाप्पा मोरया... मंगलमुर्ती मोरया...



बंधू भगिनींनो,
विघ्नविनाशक श्रीगणरायाचे आज आगमन होताहे.
श्रीगणेश चतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण असून,गणपती हे प्रत्येकाचं आराध्य दैवत आहे.मानवी जीवनाच्या प्रत्येक वळणावर म्हणजे सुख-दुःखात,संकट समयी व अडीनडीला तो आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा असतो. गणेशोत्सव असा सण आहे,ज्यात लहानांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येक जण हर्षोल्हासाने अन् भक्तिभावाने सहभागी होतो.त्याच्या पूजनामुळे शुभ कार्यात येणारी विघ्ने दूर होतात. विनायक, वक्रतुंड, विघ्नेश्वर, विघ्नहर्ता, गुणपती, लंबोदर अशा नावांनी देखील गणरायांना संबोधिले जाते.
हिंदू धर्मात कुठल्याही गोष्टीचा शुभारंभ श्रीगणेशाच्या पूजेने केला जातो.म्हणूनच त्याला आराध्य दैवत म्हटले जाते.गणपती हे केवळ विद्येची देवता नसून,ती समृद्धीची देखील देवता आहे.यासाठीच त्यांच्या दोन्ही बाजूला रिद्धी-सिद्धी उभ्या असतात.त्याबरोबरच ते गुणसंवर्धनाचे मूर्तिमंत प्रतिकही आहे. *वक्रतुंड महाकाय,सूर्यकोटी समप्रभ,निर्विघ्नं कुरुमे देव,सर्व कार्येषु सर्वदा* अशी तन्मयतेने प्रार्थना करून आपला संकल्प निर्विघ्नपणे सिद्धीस नेण्यासाठी आपण साकडे घालतो.खरं तर,सद्बुद्धी शिवाय सिद्धी प्राप्त होत नाही आणि हीच सद्बुद्धी देण्याचं काम गणराया करत असतो. गणपती म्हणजे ते अनेक गुणांचे संवर्धन करणारा गुणपती असेही म्हटले जाते.
चौदा विद्या अन् चौसष्ट कलांची पुंजी ज्यांच्याकडे आहे,त्यांची आराधना आपण करतो व त्या कला,ते गुण आम्हाला द्या,अशी प्रार्थना आपण करतो.
भक्तांच्या हाकेला गणपती धावून येतात,याची अनुभूती अनेकांना आली असेलच.कारण लालबागेचा गणपती असो वा सिद्धी विनायक,तेथील भक्तांच्या रांगा आणि तिथे बोलले जाणारे नवस हे त्याचे द्योतक आहे.
तात्पर्य,हा उत्सव शिस्तबद्धता,सामाजिक सौख्य राखून सहिष्णुता व गुण्यागोविंदाने संपन्न व्हावा,हीच श्रींची इच्छा असते. त्यातूनच अखिल मानवजात सुखी,आनंदी व समृद्ध होईल,हे निश्चित!
पारतंत्र्याच्या काळात विभिन्न जाती-धर्मातील लोकांना एकसंध करून ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देण्यासाठी लोकमान्य टिळकांनी १८९३ साली गणेशोत्सव हा सार्वजनिकरित्या साजरा करण्याचा संकल्प सोडला. त्यामागे लोकशिक्षण अन् जनजागृती ही दोन उद्दिष्टे साधण्याचा त्यांचा मानस होता.तथापि,स्वातंत्र्यानंतर काळ हा जरी आमूलाग्र बदलला असला तरी,टिळकांच्या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा व्हावा,या दृष्टीने भाविकांनी काही पथ्ये पाळावीत. सर्वप्रथम तुम्ही आम्ही सर्वांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा प्रण करावा.त्यानुसार इको फ्रेंडली स्वरूपाच्या गणेशमूर्ती असाव्यात. अर्थातच गणेश मुर्त्या ह्या शाडूच्या मातीच्या असाव्यात.दुसरं महत्वाचे म्हणजे या उत्सवादरम्यान ध्वनीप्रदूषण होऊ नये,यासाठी कानठळ्या बसविणाऱ्या डॉल्बी-डी जे सारख्या वाद्यांचा वापर कटाक्षाने टाळावा.त्याऐवजी पारंपरिक पद्धतीच्या ढोल-ताशांचा वापर करावा.वायूप्रदूषण होऊ नये,म्हणून गुलाल व अन्य रंगांची उधळण मर्यादित प्रमाणात करावी. प्रत्येकाने आपापले निर्माल्य मंगलकलशातच टाकावे. गणेशोत्सवदरम्यान गणेश मंडळे अन् गणेश भक्तांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे.वर्गणी अन् दानपेटीत जमा होणाऱ्या धनराशीतून काही रक्कम सामाजिक उपक्रमांसाठी राखून ठेवावी.याशिवाय आपापल्या वॉर्डातील गोरगरीब व असहाय्य कुटुंबातील गरजू अन् होतकरू पाल्यांच्या शिक्षणासाठी हा संचित निधी खर्ची घालावा.असं केल्याने हा पैसा सत्कर्मी लागेल.रिमिक्स संस्कृती, लखलखित रोषणाई, अतिभव्य देखावे, डी.जे.अन् त्यातील भंकस व किळसवाणी नाच-गाणी या असभ्य अन् अनावश्यक गोष्टींना गणेश मंडळांनी थारा देऊ नये.गणेशोत्सव साजरा करताना त्याचं पावित्र्य टिकवून ठेवणं,हे प्रत्येकाचे उत्तरदायित्व आहे. बोला गणपती बाप्पा मोरया...मंगलमुर्ती मोरया...!

-लेखक - रणवीर राजपूत

# लाडक्या बाप्पासाठी उकडीचे मोदक बनवत आहात?

## तज्ज्ञांकडून जाणून घ्या मोदकाचे फायदे

गणरायाच्या आगमनाची सर्वांना उत्सुकता लागली आहे. घरोघरी बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरू आहे. गणपती बाप्पासाठी उकडीचे मोदक तयार करण्यासाठी गृहिणींची तयारी सुरू झाली आहे, तर खवय्यांनादेखील केव्हा एकदा उकडीचे मोदक खायला मिळतील असे झाले आहे. बाप्पाचे आवडते मोदक भक्तगणांचा देखील आवडीचा पदार्थ! गणेशोत्सवात प्रत्येक घरात आवर्जून उकडीचे मोदक बनवले जातात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण उकडीचे मोदक आवडीने खातात.

मोदक हे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत का याचा विचार तुम्ही कधी केला आहे का?किंबहुना मोदक आरोग्यदायी प्रसाद आहे हे जाणून तुम्हाला आनंदच होईल! चला तर मग जाणून घेऊ या मोदकाचे फायदे!
आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत पटवर्धन यांनी मोदक खाण्याने आपल्या आरोग्यासाठी होणाऱ्या फायद्यांबाबत लोकसत्ताला सविस्तर माहिती दिली आहे.पल्लवी सांगतात की, मोदकामुळे आपल्याला कधीही पचनाचे काही त्रास होत नाहीत, कारण त्यात खूप तेल किंवा साखर आहे असे नसते, त्यामध्ये ठराविक प्रमाणात खोबरे आणि गूळ वापरले जाते. पारंपरिक पद्धतीनुसार मोदक उकडीचे असतात , त्यामुळे ते पचनासाठी चांगले आहेत. तळणीपेक्षा उकडीचे मोदक खाणे आरोग्यासाठी पूरक आहेत. मोदक हा स्वतंत्रपणे खाण्याचा पदार्थ आहे. आपण नेहमी जेवणांनंतर मोदकावर ताव मारतो मात्र त्यापेक्षा थोडा वेळ घेऊन मोदकाचे सेवन केल्यास उत्तम!

**मोदकांमधील पोषक घटक**

**ऊर्जा :** मोदकामध्ये कॅलरीचे (ऊर्जेचे )प्रमाण जास्त आहे. एका मोदकामध्ये साधारण २५० कॅलरीज असतात. मोदकाचे सारण खोबरे , गूळ या पदार्थांनी बनते आणि सारण तयार करताना त्यात तेल किंवा तूप वापरले जाते. ऊर्जेने भरपूर असणाऱ्या या पदार्थांमुळे एका मोदकाच्या सेवनामुळे देखील मोठ्या प्रमाणात शरीराला ऊर्जा मिळते. एका मोदकामध्ये ९ ते १० ग्रॅम फॅट्स आहेत, ६० ते ७० ग्रॅम कार्बो हायड्रेटस आहेत आणि ३ ते ४ ग्रॅम प्रथिने आहेत. एका जेवणामध्ये जितक्या कॅलरीज असणे आवश्यक आहे, त्यातील अर्ध्या कॅलरीज आपल्याला एका मोदकातूनच मिळतात.
मोदक तयार करताना त्यामध्ये तांदळाचे पीठ, खोबरं आणि गूळ हे पदार्थ प्रामुख्याने वापरले जातात. त्याचे आरोग्यासाठी होणारे फायदे जाणून घ्या.

**तांदूळ :** तांदळाच्या पीठामध्ये व्हिटॅमिन बी १ असते जे आरोग्यासाठी चांगले असते. विशेषत: महिलांना मासिक पाळीमुळे होत असलेल्या वेदना कमी करण्यासाठी व्हिटॅमिन बी १ मदत करते.

**गूळ :** सारण तयार करताना वापरला जाणारा गूळ लोह वर्धक आणि पचनासाठी उत्तम आहे. गूळ ऊर्जादायक आहेच शिवाय रक्त शुद्धीकरणासाठी देखील उपयुक्त आहे.

**खोबरं :** मोदकामध्ये वापरलं जाणारं खोबरं हे सहसा ओलं खोबरं असतं, ज्यामध्ये चांगल्या प्रमाणात स्निग्ध पदार्थ असतात आणि खनिजे देखील असतात, जे आपल्या आरोग्यासाठी चांगले असतात.

**तूप:** जेव्हा गोड पदार्थांचे सेवन केले जाते तेव्हा त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स म्हणजेच रक्तातील साखरेवर होणारा परिणाम मोजणे आवश्यक असते. त्यामुळे जेव्हा आपण मोदकावर तूप टाकतो तेव्हा त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी करतो ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण तुलनेने नियंत्रित होते.

**वेलची :** काही लोक मोदकामध्ये वेलची पूड वापरतात जे अत्यंत चांगले असते, कारण वेलची ही पोटाच्या आरोग्यासाठी चांगली असते. तसेच वेलचीपूड रक्तातील शर्करेवर सुद्धा नियंत्रण ठेवते .

### मोदकाचे आरोग्यासाठी फायदे

- मोदक हे ओमेगा ३ फॅटी ऍसिड्सने समृद्ध असल्याने ते आपल्या आरोग्यासाठी चांगले असतात.
- सांध्याच्या आरोग्यासाठी आणि पोटाच्या आरोग्यासाठी मोदक हा खूप चांगला गोड पदार्थ आहे.
- मोदकामध्ये चांगले कोलेस्ट्रॉलदेखील असतात, जे आरोग्यासाठी फायदेशीर असतात.
- मोदकामध्ये ब्युटिरिक ऍसिड शरीरातील दाहकता कमी करते.
- ऊर्जेने भरपूर असणारे मोदक वजन वाढवू इच्छिणाऱ्यांसाठी पोषक पर्याय आहे .ज्यांना वजन नियंत्रणात ठेवायचे आहे त्यांनी मात्र मोदकाचे अति सेवन टाळावे
- तळणीचे मोदक आणि उकडीचे मोदक
- गव्हाचा वापर आपल्या आहारात खूप उशिरा सुरू झाला, त्यामुळे आपल्याकडे पारंपरिक पद्धतीनुसार तांदळाच्या पीठापासून उकडीचे मोदक बनवले जातात. तळणीच्या मोदकांबाबत सांगायचे झाले तर कोणत्याही तळलेल्या पदार्थांमध्ये तितके पोषणमूल्य राहत नाही. पेढे किंवा तळलेले पदार्थ खाण्यापेक्षा मोदक हा खूप चांगला पदार्थ आहे, जो आपण आपल्या आहारात समाविष्ट करू शकतो.




# प्रवीण कुमारने रेकॉर्डब्रेक उंच उडी स्पर्धेत सुवर्णपदक

## भारताला मिळवून दिले २६ वे पदक

पॅरिस : भारतीय पॅरा ॲथलीट प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिकच्या पुरुषांच्या उंच उडी T64 स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. लहान पायांसह जन्मलेल्या प्रवीणने सहा खेळाडूंमध्ये हंगामातील सर्वोत्तम २.०८ मीटर उडी मारली आणि अव्वल स्थान पटकावले. भारताचे हे एकूण २६ वे पदक आहे, तर हे सहावे सुवर्ण आहे. भारताच्या खात्यात आतापर्यंत नऊ रौप्य आणि ११ कांस्यपदक आली आहेत. प्रवीणचे पॅरालिम्पिकमधील हे सलग दुसरे पदक आहे. यापूर्वी, त्याने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये २.०७ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नाने रौप्य पदक जिंकले होते. उत्तर प्रदेशातील नोएडा येथील प्रवीण मरियप्पन (२१) हा पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या उंच उडीत सुवर्णपदक जिंकणारा थंगावेलू नंतरचा दुसरा भारतीय पॅरा ॲथलीट आहे. अमेरिकेच्या डेरेक लॉसेंटने २.०६ मीटरच्या उडीसह रौप्यपदक तर उझबेकिस्तानच्या टेमेरबेक झियाझोव्हने २.०३ मीटरच्या उडीसह कांस्यपदक जिंकले. या कामगिरीसह प्रवीण कुमार पॅरिसमध्ये पदक जिंकणारा तिसरा भारतीय उंच उडीपटू ठरला. त्याच्या आधी शरद कुमारने रौप्यपदक जिंकले होते, तर मरियप्पनने पुरुषांच्या T63 स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.
पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. टोकियो पॅरालिम्पिक २०२० मध्ये भारताने ५ सुवर्ण, ८ रौप्य आणि ६ कांस्य पदके अशी एकूण १९ पदकांसह ही भारताची पॅरालिम्पिक स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी ठरली होती. यावेळच्या पॅरालिम्पिकमध्ये जिथे भारताने आतापर्यंत २६ पदके जिंकण्यात यश मिळवले आहे. अवनी लखेरा, नितेश कुमार, सुमित अंतिल, हरविंदर सिंग, धरमबीर आणि प्रवीण कुमार यांनी पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतासाठी सुवर्णपदके जिंकली आहेत. पॅरा थलीट मुरलीकांत पेटकर याने १९७२ मध्ये पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताला पहिले पदक मिळवून दिले होते. मुरलीकांत पेटकर हे तेच खेळाडू आहे, ज्यांच्या जीवनावर 'चंदू चॅम्पियन' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला होता.

## परेश मोकाशी आणि मधुगंधा कुलकर्णी घेऊन येत आहेत

# 'मु.पो.बोंबिलवाडी'

लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांनी त्यांचा नवीन चित्रपट 'मु.पो. बोंबिलवाडी'ची घोषणा केलीय. चित्रपट २५ डिसेंबर २०२४ रोजी रोजी प्रदर्शित करण्याचे नियोजन असून चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित करून चित्रपटाची घोषणा करण्यात आली.
परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी यांच्या गतवर्षी चित्रपटगृहांमध्ये धमाल उडवून देणाऱ्या 'वाळवी'ला नुकताच राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. 'नाच गं घुमा'लाही यंदा प्रचंड प्रतिसाद मिळविला. हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, चि सौ कां, आत्मपॅम्प्लेट यांसारख्या त्याधीच्या दर्जेदार व गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती. आता परेश आणि मधुगंधा यांनी त्यांच्या 'मु.पो.बोंबिलवाडी- १९४२ एका बॉम्बची बोंब'ची घोषणा केली आहे.
मोशन पोस्टरवरून ही स्वातंत्र्यपूर्व काळातील एक ब्रिटीशकालीन कथा आहे आणि एका बॉम्बस्फोटाभोवती ती फिरते, असा अदमास रसिकांना बांधता येतो. बॉम्बच्या पुंगळीतून हिटलरचा चेहरा बाहेर येताना दिसतो. या चित्रपटाची निर्मिती मधुगंधा कुलकर्णी, विवेक फिल्म्स आणि मयसभा करमणूक मंडळी यांची असून दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे.
या चित्रपटाबद्दल बोलताना परेश मोकाशी म्हणाले, मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी' हे नाटक लोकांना इतके आवडले की तो माझ्यासाठी एक धक्का होता! बोंबिलवाडीसारख्या छोट्या गावात इंटरनॅशनल घटना घडतात आणि त्यावर दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा निकाल लागतो ही फार्सिकल गोष्ट आजही तितकाच व्यायाम देईल फुप्फुसांना! काम सुरू झालंय!.
चित्रपटाची निर्माती मधुगंधा कुलकर्णी या चित्रपटाबद्दल बोलताना म्हणाल्या, मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' हे नाटक मी पहिल्यांदा पाहिले तेव्हा माझी हसून हसून पुरेवाट झाली होती. त्यावेळी मला वाटले की याचा चित्रपट किती उत्तम होईल. मी जेव्हा आमच्या इतर चित्रपटांच्या प्रमोशनला जायचे तेव्हा वेगवेगळ्या वयोगटातील खूप सारे प्रेक्षक म्हणजे अगदी तिशीपासून सत्तरीपर्यंतचे प्रेक्षक आम्हाला सांगायचे की, 'मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' आणा ना परत. ते सांगायचे की, त्या नाटकाने त्यांना खूप हसवले आहे. मला आश्चर्य वाटायचे की, लोकांना इतक्या वर्षांनंतर या नाटकाच्या स्मृती आहेत आणि त्यांना इतक्या वर्षांनंतर खूप हसलो, हे आठवतंय.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला 'नॅक' चे मानांकन..... 'ए' श्रेणी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषद ( नॅक) बंगळूरकडून ए श्रेणी आणि ३.०४ सीजीपीएसह मानांकन प्राप्त करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. नॅक तपासणी पथकाने नुकतीच २० व २१ ऑगस्ट महाविद्यालयाला भेट दिली या समितीमध्ये डॉ. शितिकांता मिश्रा (उपकुलगुरू शिक्षा अनुसंधान विद्यापीठ भुवनेश्वर ओडिसा) डॉ. राजशेखरन बालसुब्रमण्यम (निवृत्त प्राध्यापक व्यवसाय व व्यवस्थापन विभाग मनोमिलियन सुंदरम विद्यापीठ तामिळनाडू) डॉ. खुर्शिद अहमद खान ( प्राचार्य, इस्लामिया महाविद्यालय श्रीनगर जम्मू काश्मीर यांचा समावेश होता. नॅक तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या प्रत्येक विद्या शाखेच्या विभागांना तसेच प्रशासकीय कार्यालय, परीक्षा कार्यालय, ग्रंथालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, अध्ययन व अध्यापन विस्तार विभाग, जिमखाना इथे भेट देत संबंधित विभाग प्रमुखांशी संवाद साधला आणि महाविद्यालयाच्या कार्यप्रणालीचा अहवाल तयार केला जो नॅक पोर्टलवर अपलोड करण्यात आला आहे.
नॅक समिती विविध सात निकषांच्या आधारे उच्च शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन आणि मान्यता प्रदान करते. मूल्यमापन निकषांमध्ये अभ्यासक्रमांचे पैलू अध्यापन, शिक्षण आणि मूल्यमापन, संशोधन, नवकल्पना आणि विस्तार, पायाभूत सुविधा आणि शिक्षण, संसाधने, विद्यार्थी समर्थन आणि प्रगती प्रशासन, आणि व्यवस्थापन, मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती या संदर्भात तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या एकूण कामकाज व व्यवस्थापनाचे मूल्यांकन केले आणि ३.०४ च्या सीजीपीएसह 'ए' श्रेणी प्रदान केली. भेटी दरम्यान नॅक तपासणी पथकाने व्यवस्थापन सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थ्यांसोबत बैठक घेतली तसेच तपासणी पथकाच्या सदस्यानी कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा पुरवल्याबद्दल महाविद्यालयाची कौतुक केले. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली व्यवस्था उत्तम शिक्षण पाहून पथक खूप प्रभावीत झाले आणि नवी मुंबईतील एक उत्तम महाविद्यालय म्हणून रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा उल्लेख केला. निष्कर्षात तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या भविष्यातील प्रगतीसाठी आणि विकासासाठी सूचना दिलेल्या आदेश पथकाने दिलेल्या सूचनांच्या आधारे महाविद्यालयाने अतिरिक्त सुधारणा करण्यासाठी आणि पुढील नॅक प्रमाणक मानांकन व्यवस्थेमध्ये उच्च श्रेणी मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या योजना आखल्या आहेत. नॅक मानांकन महाविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी आणि निर्धारित गुणवत्ता मानकांचे पालन करण्यासाठी समर्पणाचे प्रतीक आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नेतृत्वाखाली रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. यासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगर पालिकेचे माजी सभागृहनेते व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर महाविद्यालय, विकास समितीचे सदस्य प्रभाकर जोशी व दीपक शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांचे आदर्श नेतृत्व आणि शैक्षणिक प्रगती बद्दलची निष्ठा यांना विशेष श्रेय आहे. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक डॉ. माहेश्वरी झिरपे महाविद्यालयाचे संपूर्ण प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषदेने ठरवलेल्या निर्धारित निकषांचे पालन करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी समग्र शिक्षण आणि शैक्षणिक प्रगतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले याविषयी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व पालकवर्गाने महाविद्यालयाचे भरभरून कौतुक केले. भविष्यातही महाविद्यालयाची अशीच उच्च गुणवत्ता पूर्ण प्रगती राहील अशी ग्वाही सर्व सेवकांनी दिली.



दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे



अग्रलेख

**गणेशागमन लाभदायक होवो**

श्री गणेशाचे आगमन आज होत आहे. त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! हिंदू धर्मात श्री गणेशाच्या पूजेला फार महत्व आहे.

........पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



निवडणुकीपूर्वी मतदारांना आर्थिक मदतीच्या योजना आणून तुम्ही मतदारांना आमिष देताय का ? यावर तुमचे मत ...

# कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांचे महाहाल

## ■ मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी
## ■ सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा

पनवेल : दरवर्षी प्रमाणे यंदाही मुंबईतील चाकरमान्यांना गणेशोत्सवात कोकणातील गाव गाठण्यासाठी तब्बल २० तासांहून अधिकचा काळ वाहतूक कोंडीत अडकून पार करावे लागल्यामुळे कोकणवासीय हैराण झाले आहेत. सरकारने मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक सुरळीत असल्याचा दावा केला होता. मात्र हा दावा वाहतूक विभागाच्या चुकीच्या नियोजनामुळे आणि रस्त्यातील खड्ड्यांमुळे पुन्हा एकदा फोल ठरला आहे. शेकडो वाहने एकाच वेळी रस्त्यावर धावणार असल्याचे माहिती असतानाही रस्त्यातील खड्ड्यांमुळे आणि नियोजन नसल्याने कोकणात जाणाऱ्या ज्येष्ठ नागरीक, बालक आणि महिला प्रवाशांना प्रचंड हाल सहन करत खडतर प्रवासाचा अनुभव गुरुवारी रात्रीपासून शुक्रवारी सायंकाळपर्यंत आला. (पान २ वर)



## गणपती आले घरा....



ठाण्याचा गणराज पंचशील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ खोपट येथील लाडक्या बाप्पाचे वाजत गाजत नाचत आगमन... (छाया – मनोज सिंह)

## गणेशोत्सव मंडळाच्या स्वयंसेवकांना 'सीपीआर' प्रशिक्षण

गणेशोत्सवात गणेश दर्शनानिमित्त उसळणाऱ्या भाविकांच्या गर्दीमुळे आणीबाणीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. गर्दीमध्ये एखाद्या भाविकाला अचानक हृदयविकाराचा त्रास होऊन तो बेशुद्ध पडल्यास कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन म्हणजेच हृदयाचे पुनरुज्जीवन (सीपीआर) केल्यास त्याचे प्राण वाचण्याची शक्यता असते. त्यामुळे मुंबईतील नामांकित गणेशोत्सव मंडळातील स्वयंसेवकांना एका खासगी रुग्णालयाकडून सीपीआरचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## गणेशोत्सवात श्रीफळ महागले

आवक वाढूनही गणेशोत्सवात श्रीफळ महाग झाले आहे. महाराष्ट्रातील कोकणपट्टीचा विचार करता १९८७ ते २०१९ या ३३ वर्षांत नारळाचे क्षेत्र ६९०० हेक्टरवरून ४३,३२० हेक्टरवर पोहोचले आहे. त्यानंतर गेल्या पाच वर्षांत नारळ धोरणात आमूलाग्र बदल करण्यात आल्याने कोकणातील नारळ उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी एकट्या कोकणातून १८.६३ कोटी नारळाचे उत्पादन झाले होते. ठाणे मुंबईला सर्वाधिक नारळ पुरवणारा प्रदेश म्हणूनही कोकण किनारपट्टीकडे पाहिले जाते.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कडेकोट बंदोबस्त

गणेशोत्सव काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह गर्दीची ठिकाणे, बाजारपेठा आणि संवेदनशील ठिकाणी साध्या वेशातील पोलिसांच्या गस्तीसोबतच सीसीटीव्ही कॅमेरे, वॉच टॉवरच्या सहाय्याने करडी नजर ठेवण्यात येणार आहे. शहरात ३२ उपायुक्त, ४५ सहाय्यक पोलीस आयुक्तांसह २४३५ पोलीस अधिकारी व १२ हजार ४२० कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणारआहेत. याशिवाय राज्य राखीव पोलीस दल, जलद प्रतिसाद पथक, दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, तसेच गृहरक्षक दल यांनाही महत्त्वाच्या ठिकाणी तैनात करण्यात येणार आहे. याशिवाय मेटल डिटेक्टर, श्वान पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथकांच्या माध्यमातूनही महत्त्वाच्या ठिकाणी नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

■ गुन्हे शाखा, घटक २, भिवंडी आणि अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर. पोलीस उपायुक्त, गुन्हे, ठाणे यांनी एमडीएमए या पार्टी ड्रग्जची तस्करी करणारे आंतरराष्ट्रीय अरोपींसह एकूण २ आरोपींना अटक करून ४७६ ग्रॅम वजनाचा एमडीएमएच्या ९५,२०, ०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.(छाया – मनोज सिंह)



# घोडबंदर रोडवरील वाहतुकीच्या परिस्थितीत सुधारणा तत्काळ होईल-आयुक्त सौरभ राव


## ■ आमदार प्रताप सरनाईक आणि घोडबंदरवासियांचे प्रतिनिधी यांच्यासह झाली बैठक

ठाणे – घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी विविध उपाय योजले जात आहेत. त्याचा परिणाम नागरिकांना लवकरच दिसू लागेल. आज असलेल्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी तातडीच्या आणि दीर्घ मुदतीच्या उपाययोजना हाती घेण्यात येत असल्याचे प्रतिपादन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले. घोडबंदर रोडवरील वाहतुकीच्या समस्यांबाबत तोडगा काढण्यासाठी महापालिका मुख्यालयात शुक्रवारी सायंकाळी बैठक झाली. या बैठकीस, आमदार प्रताप सरनाईक, घोडबंदर रोड येथे राहणाऱ्या नागरिकांचे प्रतिनिधी, पोलीस उपायुक्त (वाहतूक) दिपक शिरसाठ, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, शहर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्यासह वाहतूक पोलीस, महापालिका, मेट्रो, एमएमआरडीए, सार्वजनिक



बांधकाम यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. या बैठकीत नागरिकांनी, अवजड वाहनांच्या वेळा, रस्त्याची स्थिती, सेवा रस्त्यावरील (पान २ वर)

## थोडक्यात घडामोडी




### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय कक्षाच्या मदतीचा चढता आलेख..!

मुंबई – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील विशेष वैद्यकीय कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या आयुष्यात निरामय आरोग्याचा प्रकाश आणला आहे. गोरगरीब – गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. यानुसार कक्षाने सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत अवघ्या ८ महिन्यात एकूण १२ कोटी ७३ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

माहे, जानेवारी, २०२४ पासून ते माहे, ऑगस्ट २०२४ पर्यंत कक्षाच्या माध्यमातून ३२३ रुग्णांना मदत झाली आहे. हृदय रोग, कर्करोग, यकृत प्रत्यारोपण, मुत्रपिंड प्रत्यारोपण, बोनमॅरो ट्रान्सप्लांट, फुफुसाचे आजार, अस्थिरोग अवयव पुनर्रस्थापना शस्त्रक्रीया (ठशश्रिरलशाशपीं डीसशीळशी), यासारख्या गंभीर व सर्व सामन्यांच्या आवाक्याबाहेर असलेल्या आजारांच्या शस्त्रक्रीयेंचा समावेश आहे. गोर–गरीब रुग्णांनी धर्मादाय योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री मदत कक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.

निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांवर मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी (पान २ वर)

# आदर्श विकास मंडळाचा ४० वा वर्धापन दिन सोहळा संपन्न




ठाणे – आदर्श विकास मंडळाचा ४० वा वर्धापन दिन सोहळा १ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाला. संस्थापक अध्यक्ष बी. बी. मोरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ संस्थेचा वर्धापनदिन व शिक्षकदिनाचे औचित्य साधून शिक्षण क्षेत्रात बहुमोल योगदान देणाऱ्या व्यक्तीचा कर्मवीर पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. या वर्षीचा हा चौथा कर्मवीर पुरस्कार ठाण्यातील

## ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सुरेंद्र दिघे यांना कर्मवीर पुरस्कार

प्रतिथयश अशा सरस्वती शाळेचे संचालक सुरेंद्र दिघे यांना आमदार संजय केळकर, खासदार नरेश म्हस्के, ज्येष्ठ नगरसेवक हणमंत जगदाळे यांच्या प्रमुख (पान २ वर)

# दारुड्या रिक्षाचालकाची वाहतूक पोलिसाला बेदम मारहाण, तरुणीलाही रिक्षा ठोकली!

**उल्हासनगर– उल्हासनगरमध्ये दारुड्या रिक्षा चालकाने मद्यपान करून एका युवतीला धडक दिली होती. या घटनेनंतर वाहतूक पोलीस मोहन पाटील घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी रिक्षा चालकाला मध्यवर्ती पोलीस ठाण्यात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मद्यधुंद रिक्षा चालकांकडून वाहतूक पोलिसांना बेदम मारहाण करण्यात आली आहे. दरम्यान पोलिसांना मारहाण केल्यानंतर रिक्षा चालकांनी पळ काढलाय. यामध्ये पोलीस गंभीर जखमी झाले आहेत.**

अधिकची माहिती अशी की, रिक्षा चालकाचा एका महिलेसोबत वाद सुरू होता. हा वाद मिटवण्यासाठी वाहतूक पोलीस मोहन पाटील घटनास्थळी गेले होते. रिक्षा चालकाशी विचारपूस केली



रिक्षा चालक मद्यधुंद असल्याची प्राथमिक माहिती त्यांना मिळाली. रिक्षा चालकाने पोलिसांशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर पोलीस रिक्षा चालकाला पोलीस स्टेशनला घेऊन जात असताना त्यांना बेदम मारहाण करण्यात आली आहे. पोलीस आणि वॉर्डन यांनी देखील रिक्षा चालकाला मारहाण केली आहे. पोलीस मोहन पाटील यांना मारहाण झाल्यानंतर ते जमिनीवर पडले होते. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

■ रिक्शा चालकाने मद्यपान करून एका युवतीला धडक दिली. या घटनेनंतर वाहतूक पोलीस मोहन पाटील घटनास्थळी पोहोचले. ऑटो चालकाला मध्यवर्ती पोलिस ठाण्यात घेऊन जात असताना पोलिसांना मारहाण करण्यात आली आहे. दोन रिक्षा चालकांनी पोलिसांना मारहाण करुन पळ काढला आहे. यामध्ये पोलीस जखमी झाले आहेत. रिक्षा चालकाचा एका महिलेसोबत वाद सुरू होता. वाहतूक कोंडी झाल्याने पोलीस घटनस्थळी पोहोचले आणि सुरू असलेला वाद मिटवण्यासाठी पोलिसांनी मध्यस्थी सुरु केली होती.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

मुख्यमंत्री योजनादूत

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत राज्यात ५० हजार योजनादुतांची निवड करून त्यांना सहा महिन्यासाठी दरमहा १० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. मुख्यमंत्री योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना देतील.


उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळाला भेट द्यावी

मुख्यमंत्री योजनादूत

उमेदवार पात्रतेचे निकष
- वय १८ ते ३५ वर्षे
- कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान आवश्यक
- महाराष्ट्राचा अधिवासी असणे आवश्यक
- बँक खाते आधार क्रमांक संलग्न आवश्यक

निवडीसाठी कागदपत्रे
- विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज
- आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो, पदवी प्रमाणपत्र
- रहिवासी दाखला (सक्षम यंत्रणेच्या सही शिक्क्यासह)
- वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल

नोंदणी कालावधी : दि. ७ ते १३ सप्टेंबर, २०२४




योजनेच्या नोंदणीसाठी येथे स्कॅन करा

| एकनाथ शिंदे<br>मुख्यमंत्री | देवेंद्र फडणवीस<br>उपमुख्यमंत्री | अजित पवार<br>उपमुख्यमंत्री | मंगल प्रभात लोढा<br>मंत्री, कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग |
|---|---|---|---|

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR । माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## गणेशागमन लाभदायक होवो

श्री गणेशाचे आगमन आज होत आहे. त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! हिंदू धर्मात श्री गणेशाच्या पूजेला फार महत्व आहे. सर्व प्रकारच्या शुभकार्यात सर्वप्रथम श्री गणपतीचे पूजन केले जाते. शिव–पार्वतीचा पूत्र गणपतीला विद्येचे दैवत मानले जाते. सध्या श्री गणेशोत्सवाचे स्वरूप फार बदलले आहे. हिंदू धर्मात श्री गणेशाला कोणत्याही शुभ कार्यात प्रथम मान दिला जातो. अर्थात श्री गणेशोत्सव सौजन्याने व शांतीपूर्वक साजरा करणे महत्वाचे आहे. श्री गणेशोत्सवाचे पावित्र्य जपले पाहिजे. श्री गणेशाला सर्व विद्यांचे दैवत मानले गेले आहे ते यामुळेच !श्री गणेशोत्सव साजरा करण्याची परंपरा पुरातन काळापासून आहे. या उत्सवाला सामाजिक स्वरूप देण्यासाठी पुणे येथे श्री गणेशोत्सव १९ व्या शतकात सुरू झाला. लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. तसेच भाऊ रंगारी यांचे नावही याबाबत पुढे येते. प्रश्न सार्वजनिक गणेशोत्सव कुणी सुरू केला याचा नाही, तर या उत्सवाचे मांगल्य आपण जपू शकतो का याचा आहे. ज्या दिवशी शंकराने गणपतीला हत्तीचे तोंड लावून त्याला जिवंत केले त्या दिवशी गणेशोत्सव साजरा केला जातो. त्या दिवसाला गणेश चतुर्थी म्हटले जाते. त्यानंतर सलग ११ दिवस चालणारा हा उत्सव अनंत चतुर्थीला गणपतीच्या विसर्जनानंतर संपतो. महाराष्ट्र, गुजरात आंध्रप्रदेशात हा सण मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. भाद्रपद महिन्याच्या चौथ्या दिवशी (साधारणत ऑगस्ट, सप्टेंबर या काळात ) गणेश चतुर्थी येते. यंदा सप्टेंबर महिन्याच्या पूर्वार्धात हा सॅन आला आहे. घराघरात गणपतीची लहान मूर्ती आणली जाते व ११ दिवस मोठ्या भक्तीभावाने तिची पूजा केली जाते. श्री गणेशोत्सव काळात वाढत्या खर्चाला आळा बसावा म्हणून गावोगावी एक गाव एक गणपती या वचनाने श्री गणेशोत्सवाची परंपरा सुरू झाली आहे, ती विधायक आहे.गणेशोत्सव काळात रोज सकाळी व संध्याकाळी गणेशासमोर आरती म्हटली जाते. मोदकाचा प्रसाद दिला जातो. अकरा दिवसांनी म्हणजे अनंत चतुर्थीला मूर्तीचे नदीत किंवा तलावात विसर्जन केले जाते. आता काळाची गरज ओळखून शाडूच्या मातीची मूर्ती आणि कृत्रिम तलावात विसर्जन केले जाते. साधारणतः १८९२ साली पुण्यात गणेशोत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करायला सुरवात झाली. पारतंत्र्याचा काळ असल्याने लोकांनी एकत्र यावे, त्यांच्यात जागृती निर्माण व्हवी हा हेतु त्यामागे होता. सरदार खाजगीवाले यांनी सर्वात प्रथम गणेशोत्सव ग्वाल्हेरला साजरा केला. नंतर गणपत घोवडेकर, भाऊ वैद्य, भाऊ रंगारी यांनी गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठपना करुन हा उत्सव साजरा केला. लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला विधायक स्वरूप दिले. गणेश चतुर्थीला गणपतीची प्रतिष्ठापना केल्यानंतर काही लोक दीड दिवसांनी, काही पाच, सात किंवा अकराव्या दिवशी गणपतीचे विसर्जन करतात. गणपती बसल्यनंतर पाच दिवसांनी गौरींचे आगमन होते. त्या दोन दिवस राहतात. सातव्या दिवशी त्यांचेही विसर्जन केले जाते. सार्वजनिक मंडळे या काळात आकर्षक देखावे उभारतात. यामध्ये विविध सामाजिक प्रश्नही मांडले जातात. यात ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक देखावे असतात. अनंत चतुर्थीच्या दिवशी वाजत गाजत मिरवणूक काढून गणपतींच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. श्री गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल,शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. श्री गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने मातीपासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीची आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्री, नैवेद्य इ.सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध २१ पत्री अर्पण केल्या जातात. पावसाळ्यात या सर्व पत्री सामान्यतः उपलब्ध असतात आणि त्या प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्मही आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तरपूजा करतात. श्री महागणपतिपूजन केलेल्या नारळावर, तसेच उमामहेश्वर आणि श्री सिद्धिविनायक यांच्यावर अक्षता वाहून मूर्ती स्थानापासून थोडी हलवतात. त्यानंतर जलाशयात तिचे विसर्जन करतात. कालौघात हे व्रत कुटुंबाच्या पद्धतीनुसार दीड, पाच,सात, दहा दिवस केले जाते. काही कुटुंबात २१ दिवस हे व्रत करतात तर काही ठिकाणी हे व्रत वार्षिक स्वरूपाचे असते. या दिवशी किंवा घरात गणपती असेपर्यंत अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण केले जाते. काही ठिकाणी गणेश गीता या ग्रंथाचे वाचनही केले जाते. श्री गणेशोत्सव काळात अनेक धार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठाचा वापर केला. गाणपत्य संप्रदायाचे हे एक व्रत आहे. श्रावण शुक्ल चतुर्थी ते भाद्रपद शुक्ल चतुर्थी असे महिनाभर करायचे हे व्रत आहे. यामध्ये नदीकिनारी जाऊन, स्नान करून आपल्या हाताच्या अंगठ्याएवढी मातीची गणेशमूर्ती हातावरच तयार करावी. तिचे सोळा उपचारांनी पूजन करून ती एका नदीतच विसर्जन करावी असे हे व्रत आहे. याला पार्थिव गणेश व्रत म्हणतात. महिनाभर जमले नाही तर किमान शेवटच्या दिवशी तरी पार्थिव मूर्तीची पूजा करावी अशी यामागे धारणा आहे. सध्या काळाप्रमाणे गणेशोत्सवाचे स्वरूप बदलत आहे. गणेशोत्सवातील भडकपणा कमी होऊन त्या जागी विधायक स्वरूप येत आहे. या मांगल्याचा सणादिवशी श्री गणेशाकडे चांगली बुद्धी मागावी. वाचक व हितचिंतकांना श्री गणेश सुदबुद्धी देवो, ही कामना.

## कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांचे महाहाल

**(पान १ वरून)** ११ दिवसांपूर्वी याच महामार्गाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी करुन खड्डे बुजविण्याचे आदेश प्रशासनाला दिल्यानंतरही परिस्थिती बदलू शकली नाही. गुरुवारी रात्री ९ वाजल्यापासून मुंबईतून कोकणातील विविध तालुक्यांमध्ये मुंबई गोवा महामार्गावरुन धावणाऱ्या वाहनांना या कोंडीचा सर्वात मोठा फटका सहन करावा लागला. शुक्रवारी सायंकाळी साडेचारवाजेपर्यंत ही वाहने राजापूर तालुक्यापर्यंत पोहोचू शकली नव्हती. एरव्ही मुंबई ते कुडाळ या ८ ते ९ तासांच्या प्रवासाला तब्बल दुप्पट काळ लागल्याने प्रवाशांची कोंडी झाली. रात्री रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे झालेल्या वाहतूक कोंडीमुळे रात्री १० वाजता मालाड येथील प्रताप सावंत त्यांच्या कुटुंबियांना घेऊन खासगी वाहनाने कुडाळ येथे निघाले होते. परंतु सकाळी सात वाजेपर्यंत प्रताप यांची मोटार रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यापर्यंत वाहतूक कोंडीत अडकली होती. तसेच संगमेश्वर येथेही अशीच कोंडी अनुभवायला मिळाली. ही कोंडी कधी फुटणार नेमके याचे उत्तर देण्यासाठी कोणतेही स्वयंसेवक किंवा इतर यंत्रणा वाहतूक विभागाने उभारली नव्हती.
प्रताप सावंत यांच्या कुटुंबियांप्रमाणे शेकडो वाहनांमधील महिला, बालक तसेच ज्येष्ठ नागरिकांना वाहतूक कोंडीमध्ये त्रास सहन करावा लागल्याची माहिती कुडाळ येथे जाण्यासाठी निघालेल्या श्रावणी सावंत यांनी दिली. सरकारला जुना मुंबई गोवा महामार्गाचे कॉंक्रीटीकरण झपाट्याने करण्यापेक्षा नवीन रेवस ते रेड्डी या द्रुतगती महामार्गाच्या भूसंपादनात रस असल्याची टीका शुक्रवारी वाहतूक कोंडीत अडकलेल्या कोकणवासीयांकडून केली जात होती.

## घोडबंदर रोडवरील वाहतुकीच्या परिस्थितीत सुधारणा तत्काळ होईल –आयुक्त सौरभ राव

(पान १ वरून) पार्किंग, हातगाड्या, सिग्नल यंत्रणा, लेन मार्किंग, फ्लायओव्हरची स्थिती, वाहतुकीचे नियम मोडणारे नागरिक आदी समस्या मांडल्या. या समस्यांमुळे नागरिकांचे विशेषतः शाळकरी मुलांचे होणारे हाल होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.आमदार प्रताप सरनाईक यांनीही नागरिकांच्या समस्यांना दुजोरा दिला. त्याचबरोबर, घोडबंदर रोडवरील अवजड वाहतूक बंद व्हावी यासाठी भविष्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे राज्य सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती यावेळी नागरिकांना दिली. तसेच, अवजड वाहनांच्या वेळा पाळणे आणि बेकायदा पार्किंग थांबवणे यावर पोलिसांनी काटेकोर अमलबजावणी करावी, असेही सरनाईक म्हणाले. नागरिकांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दलही सरनाईक यांनी त्यांचे आभार मानले.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाण्यातील समस्यांबाबत अतिशय संवेदनशील आहेत. घोडबंदर रोड येथील समस्यांची त्यांना कल्पना आहे. ते त्याबद्दल सातत्याने निर्देश देत असतात. आताही गणपती विसर्जनापूर्वी सगळे रस्ते, फ्लायओव्हर हे खड्डेमुक्त करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.
आजच्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे, अवजड वाहनांच्या प्रवेशाची नियमावली काटेकोरपणे पाळली जावी. वाहतूक विभागाच्या मदतीसाठी सध्या ५० वॉर्डन आहेत. त्यांना आणखी १०० वॉर्डन तातडीने उपलब्ध करून देण्यात यावेत. त्यांचे नियोजन कापूरबावडी ते गायमुख या पट्ट्यात करण्यात यावे. वाहतूक पोलीस आणि वॉर्डन हे सकाळी सहा वाजल्यापासूनच रस्त्यावर तैनात असतील. सकाळी ६ ते १० आणि सायं. ५ ते ९ या काळात त्यांची विशेष ड्युटी असेल, असे आयुक्त राव यांनी सांगितले.
रस्त्याची स्थिती सुधारण्यासाठी पालिका तत्काळ उपाययोजना करीत असून त्याचे परिणाम १५ दिवसात दिसू लागतील. लेन मार्किंग, दिशा दर्शक, फ्लायओव्हरवरील प्रवेशापासून डिव्हायडर, झेब्रा क्रॉसिंग, जिथे रात्रीच्या वेळी जादा प्रकाशाची व्यवस्था हवी आहे तिथे ती सोय करण्यात येईल, असेही आयुक्त राव म्हणाले.
सेवा रस्त्यावरील पार्किंग थांबवणे, हातगाड्या काढणे हे काम महापालिका तातडीने करणार आहे. तसे निर्देश स्थानिक उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांना आयुक्त राव यांनी दिले.
कार्यकारी अभियंता संजय कदम हे महापालिकेच्या वतीने संबंधित नागरिक, यंत्रणा यांच्याशी नोडल ऑफिसर म्हणून समन्वय साधतील. घोडबंदर रोड ही ठाणे महापालिकेचीच पूर्णपणे जबाबदारी आहे. कोणतीही जबाबदारी पालिका ढकलणार नाही, असेही यावेळी आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

## आदर्श विकास मंडळाचा ४० वा वर्धापन दिन सोहळा संपन्न

**(पान १ वरून)** उपस्थितीत प्रदान करण्यात आला. बी. बी. मोरे यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या नवीन फोटोचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.
विद्यार्थ्यांना केंद्रिभूत ठेऊन परिघावर असलेल्या शिक्षक, पालक व संस्थाचालक यांनी विद्यार्थिहितासाठी सतत प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांच्यामध्ये आपल्या शाळेबद्दल असलेली आपुलकी वाढविण्याबद्दलचे प्रयत्न झाले पाहिजेत असे मत सुरेंद्र दिघे यांनी पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केले. शाळा महाविद्यालयासाठी स्वयंसेवी वृत्तीने काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. आर्थिक व राजकीय फायदा लक्षात न घेता फक्त आणि फक्त शैक्षणिक कार्य लक्षात घेऊन पुरस्कार्थिची निवड करण्यासाठी खासदार नरेश म्हस्के यांनी संस्थेचे अध्यक्ष सचिन मोरे यांचे कौतुक केले. शाळा व महाविद्यालयासंदर्भात सद्या घडत असेलल्या प्रकारबाबत चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, शैक्षणिक संस्थाचालकांनी व्यापक प्रमाणात पालक व विद्यार्थ्यांमध्ये सभा घेऊन विविध विषयांवर त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे, जेणेकरून होणारे अनुचित प्रकार आणि पालकांचा अवाजवी आक्रोश टाळता येईल. आमदार संजय केळकर यांनी कर्मवीर पुरस्कारासाठी अत्यंत योग्य आणि सेवाभावी व्यक्तीची निवड केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. दिघे सरांप्रमाणे सर्व शिक्षकांनी स्वयंसेवी वृत्तीने काम करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित शिक्षकांना केले.
संस्थेचे अध्यक्ष सचिन मोरे यांनी कर्मवीर पुरस्कार देण्यामागची भूमिका स्पष्ट करत असताना दिघे सरांनी पुरस्कार स्वीकारल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. बी. बी. मोरे साहेबांनी खडतर परिश्रम घेत संस्था कशी उभी केली या आठवणींना उजाळा दिला. तसेच संस्थेच्या जडणघडणीत योगदान दिलेल्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.
सदर कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र पाठक, ज्ञानसाधना महाविद्यालयाचे सचिव कमलेश प्रधान, बाबासाहेब दगडे, काशिनाथ कचरे, सौ. कविता कर्वे– वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.
संस्थेच्या विश्वस्त सौ. श्रद्धा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती प्रमुख म्हणून प्रा. प्रदीप सोनजे व इतर शिक्षकांनी संपूर्ण कार्यक्रमाचे काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मंदार टिल्लू, प्रास्ताविक वंदना भालेकर यांनी तर मानपत्राचे वाचन प्राचार्य संतोष गावडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय कक्षाच्या मदतीचा चढता आलेख..!

**(पान १ वरून)** योजना तयार केली आहे. त्यानुसार, प्रत्येक धर्मादाय रूग्णालयाने त्यांच्या रूग्णालयातील एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रूग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रूग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे या धर्मादाय रूग्णालयांना बंधनकारक आहे. या योजनेची प्रभावी व पारदर्शी अंमलबाजावणी होत नसल्याने गोर–गरीब रुग्णांना त्याचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले होते.
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी विधि व न्याय विभागाचा कार्यभार घेतल्यानंतर या योजनेची प्रभावी व पारदर्शी अंमलबजावणी करण्याबाबत पाऊले उचलली आहे. त्याचाच भाग म्हणून शासनाच्या ३१.१०.१०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रालयामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयांतर्गत राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
राज्यात धर्मादाय अंतर्गत सुमारे ४६८ रुग्णालये नोंदणीकृत असून त्यामधील सुमारे १२ हजार बेड्स निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांकरीता उपलब्ध आहेत. यामध्ये कोकीळाबेन, मुंबई, एन.एन रिलायन्स, मुंबई, सह्याद्री हॉस्पीटल, पुणे, दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे इत्यादी नामांकीत रुग्णालयांचा समावेश असून सर्वधर्मादाय योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी कक्षामार्फत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर येथे विभागीय कार्यशाळेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या मध्ये राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांनी उत्साहाने सहभाग घेतला.
निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांना या सवलतीच्या खाटा पारदर्शकपणे उपलब्ध होण्याकरीता राज्यस्तरीय विशेष मदत कक्षासाठी ऑनलाईन प्रणाली विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर असून लकरच सदर प्रणाली सर्वसामान्यांच्या सेवेत कार्यरत होणार आहे. त्यामुळे रुग्णांना अर्ज करणे आणखी सोपे होणार असून योजनेची पारदर्शी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.
केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या विविध योजना यांचा तुलनात्मक अभ्यास केला तर या धर्मादाय योजनेस उपचाराच्या खर्चाची कोणतीही मर्यादा नसल्याने कॅन्सर, लिव्हर ट्रान्सप्लांट, ह्दय प्रत्यारोपन अशा महागड्या शस्त्रक्रीया या योजनेतून निर्धन गटातील रुग्णास मोफत करण्यात येतात. त्यामुळे गोर–गरीब रुग्णांकरीता ही योजना वरदान ठरली आहे.
सद्यस्थितीत कक्षाचे कामकाज ऑफलाईन पध्दतीने सरु असुन निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मदती मिळणे राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षास अर्जासह कागदपत्रे लहरीळींहशश्र.विलो ारहरीरीहींीर.सेीं.ळप या ईमेल आयडी वर मेल करु शकतात किंवा प्रत्यक्ष कक्षात आणून देवू शकतात. धर्मादाय रूग्णालयातील बेड मिळण्याकरिता रूग्णास त्याचा, नातेवाईकांचा अर्ज, लोकप्रतिनीधींचे पत्र, आधार कार्ड / ओळखपत्र, रेशनकार्ड / तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला, डॉक्टरांचे प्रिस्क्रीप्शन आवश्यक आहे.
राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष पुर्ण क्षमतेने कार्यरत योजनेचा लाभ घेण्याकरीता निर्धन व दुर्बल रूग्णांनी लाभ घेण्यात यावा, असे आवाहन कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग
जाहीर आवाहन

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत ज्या अनुज्ञप्ती धारकांना ठाणे महानगरपालिकेत मोठी जनावरे (म्हैसवंश) व लहान जनावरे (शेळ्या- मेंढ्या) अधिकृत कत्तलखान्यात कापणे व खाजगी जागेत सर्व मांस विक्री करणारी दुकाने दरवर्षी प्रमाणे जैन धर्मियांचे पर्युषण महापर्व, जैन संवत्सरी भाद्रपद शुद्ध ४ (श्रीगणेश चतुर्थी) निमित्त शनिवार दि.०७/०९/२०२४ रोजी बंद ठेवण्याचे जाहीर आवाहन करीत आहोत. तरी सर्व मांस विक्रेत्यांनी याची नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/**आरोग्य**/447/2024-25 **सही/-**
दि: 06.09.2024 **उपायुक्त**
**Pls visit our oficial web-site** ठाणेमहानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

### MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhayandar (W) 401101, Tal. Dist - Thane, 28192828
PWD/ELECTRIC DEPARTMENT

No.MNP/PWD/Tender/ 64/2024-25 Date -06/09/2024

**// Re-Tender Notice No. 64 //**

**Selecting an agency to establish a policy for renting out properties owned by the Mira Bhayandar Municipal Corporation** in Government / Semi Government Public Sector Organizations and Activities / Local Self Government Etc. against the Contractor. Proceedings for Cancellation of Registration Pursuant to disciplinary Proceedings have been / are in progress. Such Contractors cannot participate in the tender process. Tender Notice and Tender Form on the website https://mahatenders.gov.in from **Dt.11/09/2024 to Dt.19/09/2024 till 12.00 pm.** Tender Form Fee and EMD Should be submitted through online Receipt System, failing which the tender will be disqualified. There is no any concession to qualified unemployed Engineer for EMD/Security deposit.
The last date for submission of tenders completed in all respects on **Dt.20/09/2024 up to 12.00 pm** on the above mentioned website, Mira Bhaindar Municipal Corporation. The tenders shall be opened in the presence /Absense of the bidders or their representatives on **Dt.23/09/2024 at 12.30 pm** at the tender scell of Mira Bhaindar Municipal corporation.

Ref No. MBMC/ PRO/ E-2781348/2024-25
Date :- 06/09/2024

Sign/-
City Engineer
Mira Bhaindar Municipal Corporation

Place:- Bhaindar
Date :- 06/09/2024

### कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

दूरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**नोटीस**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारे झाड तोडणेस/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एन.आर.सी.लि. | स.नं. १०, स.नं. ११/३, स.नं. १२, स.नं. १३/१, २ए, २बी, २सी, ३, स.नं. १४/१, २, ३, ४, ५, स.नं. १५/१, २, ३, ४, ५ ए, ५ बी, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, स.नं. १६/१, २, स.नं. १७/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८ ए, ८ बी, ९, १०, ११, १२, १३, १४, स.नं. १८ / १, २ ए, २बी, ३, ४, स.नं. १९/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८,९, स.नं. २०/१, २, ३, ४, स.नं. २१/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ए, १२ बी, १३, १४, १५,१६, १७ ए, १७ बी, स.नं. २३/१, २, ३ए, ३ बी, ३सी, ३डी, ३ई, ३ एफ, ४, ५, ६, ७, स.नं. २४/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, मौजे – आंबिवली | १८३ | वेअर हाऊस-1C चे विकासकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जाक्र. कडोंमपा /जसंवि / मुका / १६२१
दि. ०६/०९/ २०२४

सही/–
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी
वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्ह्यू बिल्डींग, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४०० ६०१

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक : **ध उ आ/५८/२०२४** **M.A.-272/24**
सार्वजनिक न्यासाचे नाव : **कल्याण गायन समाज**
**न्यास नोंदणी क्र. एफ/२२/ठाणे**
अर्जदार श्री./श्रीमती : **श्री. नंदकिशोर प्रभाकर मुजुमदार**

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी **महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये** खालील मुद्दांवर चौकशी करणार आहेत :–
अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे की, खालील विश्वस्तांना विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. मधुकर विनायक भाटवडेकर २) श्री. दिलीप मधुकर दळवी
३) श्री. गोपाळ कृष्णा भिडे
तसेच, खालील नमूद विश्वस्तांचा विश्वस्त म्हणून विश्वस्त मंडळात समावेश करण्यात आला आहे.
१) श्री. गोपाळ कृष्णा भिडे २) श्री. कंडरथंडा मडप्पा नंजप्पा
३) श्री. शैलेन्द्र जल्लावार
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर प्राप्त होईल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०६-०९-२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/–
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा. बां. विभाग
निविदा सुचना

सार्व. बांधकाम विभाग या विभागातर्फे ठाणे महानगरपालिकेच्या" मागासवर्गीय निधी "या लेखाशिर्षका अंतर्गत १) प्र.क्र. ०७ मधील सुभाषनगर बस्ती परिसरातील पोखरण रस्ता क्र. ०२ येथील फुटपाथचे स्टॅम्प कॉंक्रिटीकरण करणे. २) प्र.क्र.०४ मधील नळपाडा वस्ती येथील सार्वजनिक शैचालयाचे नुतनीकरण करणे अशा एकूण दोन (०२) कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही.निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दिनांक ०६/०९/२०२४ ते १३/०९/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा National Information Centre System संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दिनांक १३/०९/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दिनांक १८/०९/२०२४ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा--मा.मा.प्र.स /४४८/२०२३-२४ **सही**/-
दि:०६.०९.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

### नवी मुंबई महानगरपालिका

**शुध्दिपत्रक**
**मुदतवाढ**

नवी मुंबई महानगरपालिकेकडून कोपरखैरणे विभागातील सेक्टर 19 A येथील भूखंड क्रमांक (118 आणि 120), के 66 आणि के 67 (केएम -05) येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे निविदा सुचना क्रं.नमुंमपा/श.अ./ 87/2024-2025 (Online Etender No. 2024_NMMC_1073386_1) अन्वये https:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online निविदा दिनांक 22/08/2024 ते दिनांक 05/09/2024 रोजीपर्यंत मागविण्यात आली आहे.
तथापी सदर निविदेस दिनांक 12/09/2024 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून दिनांक 13/09/2024 रोजी निविदा उघडण्यात येईल.(दुपारी 03.00 वा.शक्य झाल्यास).
निविदेतील अटी/शर्तीमध्ये इतर कोणताही बदल नाही याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त,नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/346/2024

actionaid
ActionAid Association (India)

ActionAid Association
Kastur Mahal, Plot No.: 9, Wing – B, Flat No.: 15,
First Floor, Sion Station Road, Mumbai - 400022

**TENDER NOTICE**

ActionAid Association invites sealed bids from eligible bidders for supply of SAMSUNG HD Smart LED Televisions which includes delivery charges, installation charges with all GST Amount and commissioning of SAMSUNG HD Smart LED TVs at Thane (20 Thane Municipal Corporation Schools) and Navi Mumbai (9 Navi Mumbai Municipal Corporation Schools) locations.

Product Details are as under: -

| Sr. No. | Product Name | Configuration | Quantity |
|---|---|---|---|
| 1 | Samsung UA55BU8000K 55 Inch LED 4K, 3840 x 2160 Pixels TV | Size - 55 Inch<br>Resolution - 4K, 3840 x 2160 Pixels<br>Refresh Rate- 60 Hz<br>Sound - Total Speaker output 20W<br>Connectivity Port - USB Ports -2 & HDMI Ports-3<br>Warranty- 1 Year | 29 |

- **Eligibility of Vendors / Suppliers:**
  - Supplier/Vendor must have GST registration number.
  - Supplier/Vendor should not be blacklisted in records of Indian Govt.
  - Any overwriting not acceptable in the tender copy.
  - Supplier/Vendor should attach their necessary documents like- PAN, Bank Details & GST registration and Income Tax Return is mandatory.
  - Delivery of Goods (PCs) within 7 Days of Order Placed or Confirmed

The Envelope Should Marked as **'THANE & NAVI MUMBAI LOCATION'** and Complete set of documents including quotation should reach us to our official address mentioned in this tender on or before **16th September 2024 by 5:00 PM** through registered post / courier / Hand Delivery.

मिरा भाईंदर पालिका क्षेत्रातील सी.सी टीव्हीसाठीचे मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्षाचे दूरदूरश्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण संपन्न

# मिरा-भाईंदर पालिकेचे अनुकरण इतर पालिकांनीही करावे : मुख्यमंत्री

ठाणे : मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे अनुकरण इतर महानगरपालिकांनी करावे, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सी.सी. टीव्हीसाठीचे मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्ष लोकार्पण सोहळ्यात केले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून भारतरत्न गानसम्राज्ञी मंगेशकर नाटयगृह येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, मिरा-भाईंदर-वसई -विरार शहर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, महापालिका अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## चुकीच्या प्रकाराला आळा बसणार

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विद्यार्थ्यांना आपण सुरक्षित आहोत असे वाटणे गरजे आहे. कोणत्याही प्रकारची भिती मनात वाटू नये. सी.सी.टीव्ही लाईव्ह फुटेज पाहता येणार आहे. यामुळे चुकीच्या प्रकाराला आळा बसणार आहे. विद्यार्थ्याची सुरक्षा महत्वाची आहे. शालेय शिक्षण विभागात नियम कडक करण्यात आले आहेत. सर्वांनी सावधगिरी काम केले पाहिजे. आपले राज्य शिक्षण क्षेत्रात अन्य राज्यांच्या पुढे आहे. शालेय शिक्षणात आपल्या राज्याचे नाव अग्रेसर राहिले पाहिजे. महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणांचा पाया भक्कम केला आहे.

*यावेळी प्रास्तावित करताना आयुक्त संजय काटकर म्हणाले की, १२ लाख लोकसंख्या असणारे मिरा-भाईंदर महानगर शहर आहे. महानगरपालिकांच्या ३६ शाळा आहे. १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिका शाळांमध्ये २०० सी.सी.टीव्ही बसविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना सर्व सुविधा देण्यात येत आहे. १ ते १० वी पर्यंत शिक्षण मोफत आहे. फुटेजची नेहमी तपासणी करणे. चुकीचा प्रकार घडल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. दि.२४ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार सी.सी.टीव्ही बसविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. हा नियम खाजगी शाळांना सुध्दा लागू आहे. तशा त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार व आयुक्त काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष सुरू झाला असून या कक्षाद्वारे विद्यार्थांच्या विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षितेचा प्रश्न अतिशय संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी उचलले गेलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.*

## चुकीच्या प्रकाराला आळा बसणार

***महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. शाळेमध्ये कर्मचारी नियुक्ती करताना त्यांची पार्श्वभूमी नीट तपासून घ्या. शाळांमध्ये शालेय तक्रार पेटी ठेवा. संस्थाचालकांनी आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडा. अत्याचार करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई केली जाईल. शक्ती कायदा तयार करुन मंजूरीसाठी केंद्राकडे पाठविला आहे. गुन्हेगाराला कायद्याची भीती वाटली पाहिजे. मुली महत्वाच्या आहेत. मुलींच्या सुरक्षेसाठी जे उपाय करण्याचे गरजेचे आहेत ते करीत आहोत. आपण निर्भय-निश्चिंत राहा. सरकार तुमच्या पाठीशी आहे. आज शिक्षक दिन आहे. शिक्षक म्हणजे म्हणजे गुरुजन आहेत. शासनाच्या वतीने आपणाला जे लागेल ते आम्ही देवू. आपल्या शहराचे व देशाचे नाव मोठे करा. महिला पोलिसांनी शाळांमधून नियमित गस्त वाढवायला हवी.***

अत्याधुनिक सर्व्हर आणि विशेष कार्यप्रणालीयुक्त असा यु.पी.एस. जनरेटर बॅकअप असलेल्या नियंत्रण कक्षात एकाच वेळी साधारण एक हजार सी.सी.टी. व्ही. कॅमेऱ्यांवर नजर ठेवणारी अद्यावत यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या कक्षात संगणक, व्हिडिओ वॉल, सभाकक्ष, एक बॅकअप सर्व्हर, देखरेख ठेवण्यासाठी असलेले अधिकारी व कर्मचारी आणि प्रशस्त वातानुकूलित जागा असलेल्या या कक्षात सद्य:स्थितीत मनपा शाळा यांच्यावर लक्ष केंद्रित केले असून भविष्यात मिरा भाईंदर शहरातील सर्व खाजगी शाळेतील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुद्धा या उपक्रमात समाविष्ट करण्यात येतील. या नियत्रंण कक्षात कार्यरत असलेले पथक मनपा शाळेतील सीसीटीव्ही फुटेज सकाळी सात ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तपासण्याचे व त्याचे जतन करण्याचे काम करतील. मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उचललेल्या या महत्त्वपूर्ण पावलामुळे भविष्यात घडणाऱ्या अनुचित घटनांवर कायमस्वरूपी आळा बसून हा विषय अतिशय संवेदनशीलपणे हाताळण्यात नक्कीच मदत होणार आहे.

# गणेश भक्तांसाठी मोफत बस सेवा




कळवा: :महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वतीने तसेच कल्याण लोकसभेचे खासदार श्रीकांत शिंदे व शिवसेना उपनेते दशरथ दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही खारीगाव पारसिक नगर या परिसरातील गणेशभक्तांसाठी मोफत एसटी बस सुविधा उपलब्ध केली होती. कोकणातील चिपळूण, गुहागर, राजापूर, खेड, रत्नागिरी, देवगड, कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी, कराड, कोल्हापूर, गडहिंग्लज अशा विविध ठिकाणांसाठी गणेशोत्सवासाठी बस सोडण्यात आल्या.

याप्रसंगी शिवसेना उपनेते दशरथ दादा पाटील, नगरसेवक उमेश पाटील, ठाणे शहरसंघटक नरेंद्र शिंदे, कळवा उपशहरप्रमुख राकेश पाटील, नगरसेवक दिनेश कांबळे, पारसिक नगरचे शाखाप्रमुख महेश गवारी, निनाद बोऱ्हाडे, सिकंदर केणी, बाळा म्हात्रे, पूनम पाटील, प्रशांत पाटील, विशाल खलाटे, जय पाटील, सहसंघटक रचना पाटील, महिला आघाडी संघटक अर्चना पाटील व कोकणवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन दिवसात एकाच कुटुंबातील ७ जण बेपत्ता

# नालासोपारा पोलिसांनी लावला छडा

**वसई : नालासोपाऱ्यात एका विचित्र घटनेत एकाच कुटुंबातील ७ जण बेपत्ता दोन वेगवेगळ्या दिवशी बेपत्ता झाले होते. त्यात ११ वर्षांच्या दोन मुली तसेच एक महिला आणि तिच्या ४ मुलांचा समावेश होता. नालासोपारा पोलिसांनी कसलाही दुवा नसताना २५० हून अधिक सीसीटीव्हीच्या मदतीने या सर्वांचा शोध घेऊन त्यांना शोधून काढले.**

फिर्यादी अनिल कदम (३६) हे पत्नी अर्चना (२५) आणि ४ मुलांसह नालासोपारा पश्चिम येथील श्रीपस्थ कॉलनीत राहतात. २६ ऑगस्ट रोजी त्यांच्या घरी मेव्हणीच्या लक्ष्मी आणि सोनी या ११ वर्षाच्या मुली राहण्यासाठी आल्या होत्या. २६ ऑगस्ट रोजी या दोघी मुली खाऊ आणण्यासाठी गेल्या त्या घरी परतल्याच नाही. अनिल कदम यांची पत्नी अर्चना कदम (२५) या दोन्ही भाच्या बेपत्ता झाल्याने चिंतेत होत्या. आता गावी बहिणीला काय उत्तर द्यायचे हा प्रश्न त्यांना पडला होता. त्यामुळे २७ ऑगस्ट रोजी अर्चना या देखील आपल्या दोन भाच्यांना शोधण्यासाठी निघाल्या. सोबत त्यांची ४ मुले होते. त्यात सोनी (१०), रोशनी (७) दिपक (५) आणि अक्षय (३) या चौघांचा समावेश होता. मात्र त्या देखील घरी परतल्या नाहीत. या मुळे अनिल कदम यांच्या पायाखालची जमीन सरकली.

याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दोन दिवसात एकाच कुटुंबातील ७ जण बेपत्ता झाल्याने पोलीसही चक्रावले. तनालासोपारा पोलिसांनी या घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक तयार केले. अर्चना कदम यांच्याकडे मोबाईल फोन नव्हता. त्यामुळे शोधणे कठीण होते. मात्र पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे शोध घेतला. दोन दिवसांनी अर्चना कदम या नालासोपारा पूर्वेला आढळून आल्या.

## घोडबंदर मार्गावरील उड्डाणपूलावर पुन्हा अपघात

ठाणे : घोडबंदर येथील मानपाडा येथे शुक्रवारी सकाळी राज्य परिवहन सेवेची (एसटी) बसगाडी उड्डाणपूलाच्या सुरूवातीला असलेल्या कठड्याला धडकली. सुदैवाने अपघात झाला तेव्हा बसगाडीमध्ये प्रवासी नव्हते. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. या अपघातामुळे घोडबंदर मार्गावर काहीकाळ वाहतुक कोंडी झाली होती. तर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. गेल्याकाही दिवसांपासून घोडबंदर मार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. अपघात, रस्त्यांची कामे तसेच अपुऱ्या वाहतुक उपाययोजना यामुळे नागरिकांना प्रचंड मन:स्तापाला सामोरे जावे लागत आहे. शुक्रवारी सकाळी पुन्हा अपघाताचा फटका नागरिकांना सहन करावा लागला.

# माँ साहेब मिनाताई ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त मिनाताई ठाकरे चौकात गोर गरीबांना फळ वाटप

ठाणे : तमाम शिवसैनिकांच्या लाडक्या माँ साहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त ठाण्यातील कॅसलमिल नाका येथील मीनाताई ठाकरे चौकात शिवसेना उपनेते, मा. आमदार, मा. महापौर स्व. अनंत तरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत असलेल्या माँ साहेबांच्या स्मृतीदिना प्रित्यर्थ आज शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने माँ साहेबांच्या अर्थ पुतळ्याला अभिवादन करुन गोर गरीबांना फळ वाटप करण्यात आली.

माँ साहेबांच्या स्मृतीदिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला व ज्यांच्या मार्गदर्शनाखाली माँ साहेबांच्या स्मृतीदिन साजरा होत आला ते शिवसेना उपनेते स्व. अनंत तरे यांच्या तस्बीरीला पुष्पहार अर्पण करुन दिप प्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर माँ साहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याला पुष्पहार ठाणे लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार राजन विचारे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आला. तर माँ साहेबांच्या पुतळ्याची पुजा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्याच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गरीबांना फळ वाटप करण्यात आले.

या प्रसंगी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे ठाणे लोकसभेचे माजी खासदार राजन



विचारे, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, ठाणे शहरप्रमुख प्रदिप शिंदे, ठाणे शहर समन्वयक संजय तरे, ठाणे जिल्हा महिला उप जिल्हाप्रमुख महेश्वरी तरे, माजी नगरसेविका विद्या कदम, वृंदावन श्रीरंग विभागाचे विभागप्रमुख मयुर पैलकर, महिला विभागप्रमुख नंदा कोथळे, विभाग समन्वयक योगेश भोईर, विभागप्रमुख हेमचंद राठीवडेकर, विभागप्रमुख भालचंद्र देसाई, उपविभागप्रमुख मनोज पाटील, महिला उप विभागप्रमुख राजश्री सुर्वे, खोपट शाखाप्रमुख राजु महाडीक युवा सेना शाखा अधिकारी सागर माने, शाखाप्रमुख धनंजय येंडे, उप शाखाप्रमुख मंदार घोरपडे, वृंदावन उप शाखाप्रमुख विलास घाग, महिला उप विभाग संघटक अनुराधा चव्हाण, महिला शाखा संघटक जयश्री बामगुडे, भुपेंद्र सिंग आठवल, तुकाराम डोंगरे, डॉ. दिपक चांगलानी, बाबु देशमुख, बळीराम दळवी, सुर्यकांत शिंदे, मोहन देशमुख, संजय यादव, संतोष गवई, सुनिल भोईर आदी शिवसैनिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना ठाणे शहर समन्वयक संजय तरे व ठाणे जिल्हा महिला उप संघटक महेश्वरी तरे तसेच आझादनगर शाखेचे शाखाप्रमुख संतोष दंत व महिला शाखा संघटक जयश्री बामगुडे यांनी केले




# महेंद्र कोंडे लिखित 'बोलता बोलता' हे 'यशस्वी निवेदनाचे पाठ्यपुस्तक' : प्रा. दवणे

नवी मुंबई : निवेदन, सूत्रसंचालन क्षेत्रातील वैविध्य टिपणारे 'बोलता बोलता' हे महेंद्र कोंडे यांचे पुस्तक जणू 'यशस्वी निवेदनाचे पाठ्यपुस्तक' असून हे पुस्तक वाचून, अभ्यासून आणखी आठ-दहा वर्षांनी चांगल्या निवेदकांची फळी महाराष्ट्रात निर्माण झाली तर आश्चर्य वाटायला नको अशा शब्दात सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांनी या पुस्तकाचे महत्व सांगत शुभेच्छा दिल्या.

व्यास पब्लिकेशन हाऊस प्रकाशित 'बोलता बोलता' या निवेदक महेंद्र कोंडे लिखित पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, गीतकार प्रा.प्रवीण दवणे यांच्या शुभहस्ते ठाणे येथे मोजक्या साहित्य रसिकांसह अतिशय आत्मिय वातावरणात संपन्न झाले. याप्रसंगी सौ. प्रज्ञा दवणे, लेखक - निवेदक महेंद्र कोंडे, व्यास क्रिएशन्सचे संचालक निलेश गायकवाड, व्यास पब्लिकेशन हाऊसच्या प्रकाशिका सौ. वैशाली गायकवाड, साहित्यिक विनोद पितळे, निवेदिका वेदश्री दवणे उपस्थित होते.

वाद्यवृंदांचे बैठकी निवेदन, उभ्याने निवेदन, विविध स्वरूपाच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन, आकाशवाणी, दूरदर्शन, एफ एम वाहिन्या, ऑनलाइन कार्यक्रम यांचे निवेदन अशा नानाविध क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या या पुस्तकामधील सगळी प्रकरणे ओघवत्या निवेदनासारखी असून केवळ निवेदन, सूत्रसंचालनच नाही तर व्यासपीठावर कोणत्याही प्रकारची शब्द मुशाफिरी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत उपयोगी असल्याचे प्रवीण दवणे म्हणाले.

ज्ञानसाधना महाविद्यालयात प्रवीण दवणेसर वर्गात बोलू लागले की प्राणांचे कान करून ऐकण्याच्या संस्कारातूनच सूत्रसंचालन, निवेदनाची बीजे खोलवर रुजली असावीत असे सांगत निवेदक, लेखक महेंद्र कोंडे यांनी प्रवीण दवणसरांचे अभ्यासपूर्ण प्रस्तावनारुपी शब्दाशीर्वाद या पुस्तकाला लाभणे हा भाग्ययोग असल्याचे म्हटले. वर्तमानपत्रातील सदरात पहिला लेख छापून आला त्याच दिवशी याचे आपण पुस्तक करूया हा शब्द खरा करणारे बालमित्र, व्यास क्रिएशन्सचे निलेश गायकवाड व त्यांच्या पत्नी व्यास पब्लिकेशन हाऊसच्या प्रकाशिका वैशाली गायकवाड यांचे त्यांनी विशेष आभार मानले. याप्रसंगी निलेश गायकवाड, वैशाली गायकवाड व विनोद पितळे यांनी शब्द शुभेच्छा दिल्या. निवेदिका वेदश्री दवणे यांनी या कौटुंबिक स्वरूपातील पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे ओघवते सूत्रसंचालन केले.

## गणेशोत्सवाची खरेदी करून परताना दुचाकीचा अपघात

वसई :विरार पूर्वेच्या शीरसाड अंबाडी मार्गावरील चांदीप येथे गणेशोत्सवासाठी कपडे खरेदी करून परतणाऱ्या दुचाकीस्वाराला टेम्पोची धडक लागून अपघात घडला आहे. यात बारा वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाला आहे.मानसी पाटील असे या मुलीचे नाव आहे.गुरुवारी सायंकाळी साडे सहाच्या सुमरास घडली आहे.

७ सप्टेंबर पासून गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. त्यामुळे गणेशोत्सवा खरेदीसाठी लगबग सुरू आहे.मांडवी येथे राहणारे धनंजय पाटील आपल्या दुचाकीवरून दोन्ही मुलांना घेऊन उसगाव येथे कपडे खरेदीसाठी गेले होते.खरेदी करून घरी परतत असताना चांदीप जवळ पोहचताच भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर टेम्पो ने दुचाकीला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात धनंजय पाटील व त्याची दोन्ही मुलं दूरवर फेकली गेली त्यावेळी मुलगी मानसी पाटील हिच्या डोक्यावरून गाडीचे चाक गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तर मुलगा ओमकार यास डोक्यात दुखापत झालेले आहे यावेळी टेम्पो चालक पळून गेला आहे. याप्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.









# श्रीमूर्ती विसर्जनासाठी १३६ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती

## जलप्रदूषण टाळण्याचे नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आवाहन

नवी मुंबई : संपूर्ण जगभरात उत्साहाने साजरा होणारा गणेशोत्सव नवी मुंबईतही मोठया प्रमाणात साजरा होत असून सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी पर्यावरणपूरकतेची कास धरत 'इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करावा असे आवाहन मागील महिन्यातच नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नागरिकांना केले आहे. आयुक्तांनी केलेल्या आवाहनास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

नागरिकांनी पर्यावरणाची जपणूक करण्याच्या दृष्टीने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींची प्रतिष्ठापना न करता पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करावी तसेच श्रीमूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतात न करता महानगरपालिकेने ठिकठिकाणी निर्माण केलेल्या १३६ कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन आयुक्तांमार्फत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे श्रीगणेशोत्सवाच्या सजावटीत प्लास्टिक व थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळून कापड, कागद अशा पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करावा तसेच कर्णकर्कश्य ध्वनी टाळून मर्यादित आवाजात वाद्यांचा वापर करावा तसेच लेझर लाईटचा वापर टाळावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

श्रीगणेशोत्सवामध्ये मंडप उभारणीकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेले नसून ५ वर्षांसाठी परवानगीचा निर्णयही घेण्यात आलेला आहे. मंडप परवानगीसाठी ई सेवा संगणक ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिल्याने १७६ गणेशोत्सव मंडळांनी सुलभ रितीने परवानगी प्राप्त करून घेत समाधान व्यक्त केले आहे.

इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे मंडळांना आवाहन करताना श्रीगणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी नागरिकांना त्यांच्या घरापासून जवळ विसर्जनस्थळे उपलब्ध व्हावीत याची खबरदारी घेत १३६ इतक्या मोठया प्रमाणावर कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आली आहे.

या कृत्रिम तलावांच्या जागा परिमंडळ व अभियांत्रिकी विभागामार्फत निश्चित करण्यात आल्या असून त्याठिकाणी कृत्रिम तलाव उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. यामध्ये बेलापूर विभागात १९, नेरुळ विभागात २६, वाशी विभागात १६. तुर्भे विभागात १७, कोपरखैरणे विभागात १५, घणसोली विभागात १५, ऐरोली विभागात १८ व दिघा विभागात १० अशाप्रकारे एकूण १३६ कृत्रिम विसर्जन तलाव उभारले जात आहेत. नागरिकांनी प्राधान्याने कृत्रिम विसर्जन तलावांचाच वापर करावा असे आवाहन विविध माध्यमांतून करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २२ पारंपारिक विर्सजन स्थळे असून त्याठिकाणी होणारी भाविकांची गर्दी विभागली जावी व एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये याकरीता मागील काही वर्षांपासून कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात येत आहे. कृत्रिम तलावांमुळे नैसर्गिक जलस्तोतांतील जलप्रदूषणाला प्रतिबंध होऊन त्यांचे प्रदूषण कमी होत असते. नवी मुंबई हे स्वच्छ शहराप्रमाणेच पर्यावरणशील शहर म्हणून नावाजले जात असून या इतक्या मोठया संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम तलावांमुळे पर्यावरणरक्षणाच्या दृष्टीने एक सकारात्मक यशस्वी पाऊल उचलले जात आहे. या कृत्रिम तलाव संकल्पनेला नागरिकांचा मिळणारा चांगला प्रतिसाद लाभताना दिसत आहे.







'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१